■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३२५ ■ मंगळवार दि.१२ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 325 ■ Tuesday Dt. 12 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# कारागृहाच्या भिंती ओलांडून ‘खोक्या’पर्यंत पोहोचतोय गांजा; गांजा वाटपावरून कैद्यांत ढिशूम-ढिशूम?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# बीड कारागृहात ‘खोक्या’ची दहशत, गांजावरून कैद्यांचा तुफान वाद, पोलिसालाही दिली धमकी?

## खोक्या’ने तुरुंगालाच बनवला गुन्हेगारी अड्डा, प्रशासनाचा निष्काळजीपणा उघड; कारागृह प्रशासनाची शिस्त कुठे गायब?

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा गुन्हेगारी जगतात खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखला जाणारा आणि सध्या कैदेत असलेला सतीश भोसले ऊर्फ ‘खोक्या’ याच्या अजब कारनाम्यांचा सिलसिला तुरुंगातसुद्धा थांबलेला नाही. मिळालेल्या माहितीनुसार, कैदेत असूनही खोक्या पर्यंत गांजा पोहोचत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे तुरुंग प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आतल्या आत कैद्यांना बाहेरील बेकायदेशीर वस्तू कशा पोहोचतात, यावरील सुरक्षेच्या त्रुटींचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.**



गुन्हेगारी पार्श्वभूमी, राजकीय पाठबळ आणि तुरुंगातील सैल कारभार या सगळ्यांचा संगम या घटनेत स्पष्टपणे दिसत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. याप्रकरणी चौकशीची मागणी होत असून, दोषींवर कठोर कारवाईची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. कारागृहातील बॅरेक क्रमांक चारमध्ये गांजा वाटून घेण्यावरून चार कैद्यांमध्ये वाद झाला. वाद सोडवण्यासाठी धाव घेतलेल्या बंदोबस्तावरील पोलिस कर्मचाऱ्याला कैद्यांनी शिवीगाळ करत बाहेर सुटल्यावर पाहून घेण्याची धमकी दिली.

या प्रकारामुळे कैदी सतीश भोसले ऊर्फ ‘खोक्या’ची तुरुंगातील दहशत अद्याप कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.गांजा वाटून घेण्यावरून सतीश भोसले ऊर्फ ‘खोक्या’, शाम पवार, वसीम पठाण आणि यमराज राठोड यांच्यात वाद झाला. वाद सोडवण्यासाठी धाव घेतलेल्या बंदोबस्तावरील पोलिस कर्मचाऱ्याला चौघांनी शिवीगाळ करत बाहेर सुटल्यावर पाहून घेण्याची धमकी दिली. खोक्या भोसलेवर सध्या चार गुन्ह्यांमध्ये कारावासाची शिक्षा सुरू आहे.या घटनेची कारागृह पोलिसांनी गंभीर दखल घेत बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

यापूर्वीही बीड कारागृहातून गांजा व मोबाईल फोन सापडल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, आता तर गांजा वाटून घेण्यावरून कैद्यांमध्ये वाद आणि कर्मचार्याला धमकी देण्यापर्यंत प्रकार पोहोचल्याने कारागृह प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे.

### कारागृहातील गोंधळामुळे सुरक्षा आणि प्रशासनावर प्रश्नचिन्ह?

बीड जिल्हा कारागृहातील बॅरेक क्रमांक चारमध्ये गांजावरून झालेल्या वादामुळे पुन्हा एकदा तुरुंगातील सुरक्षा व्यवस्थेवर आणि प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कैद्यांत झालेल्या वादात सतीश भोसले ऊर्फ ‘खोक्या’सह इतर कैद्यांचा सहभाग होता. याप्रकरणी बंदोबस्तावरील पोलिस कर्मचाऱ्यालाही धमकी देण्यात आली. याआधीही बीड कारागृहातून गांजा आणि मोबाईल सापडल्याच्या घटना घडल्या असून, वारंवार होणाऱ्या अशा प्रकारांमुळे कारागृह प्रशासनाचा निष्काळजीपणा चव्हाट्यावर आला आहे.

## प्रभारी अधिकारी राजेश गडवे यांचा वाळू माफियांना तिसरा दणका

### राक्षसभुवनमध्ये वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला; चालक फरार

**गेवराई । प्रतिनिधी**

राक्षसभवन गावात रात्रीच्या गस्त करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात वाळूने भरलेला ट्रॅक्टर आढळून आल्याने त्यास प्रभारी पोलिस अधिकारी राजेश गडवे आणि गोपनीय शाखेचे येळे यांनी पाठलाग करत तो ट्रॅक्टर पकडून कार्यवाही केल्याने वाळू माफियांना गडवे यांनी तिसरा दणका दिला असून पोलिस हवालदार अमोल येळे यांच्या फिर्यादी वरुण ट्रॅक्टर वर गुन्हा दाखल करून चार लाख पंच्याऐंशी हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून एपीआय राजेश गडवे यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी पदभार घेतच दोन नंबर वाल्यांना दणका दिला आहे,एक पाठोपाठ धडक तीन कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात या कारवाईचे कौतुक होत आहे.पदभार घेतच धडक कारवाईला सुरुवात करून राजेश गडवे यांनी आपल्या कार्याची तत्परता दाखवून दिली.

दिनांक ६ रोजी उपविभागीय पेट्रोलिंग दरम्यान राक्षसभवन गावात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी त्याचा पाठलाग केला परंतु चालकाने अंधाराचा फायदा घेत गावातील गल्लीत ट्रॅक्टर पळवला आणि ट्रॅक्टर जागीच सोडून

▶ पान २ वर



## वैद्यनाथ बँक मुंडे बंधू भगिनींच्या ताब्यात!

### १७ पैकी चार जागा बिनविरोध आल्याने उर्वरित १३ जागांसाठी झाले होते मतदान



**बीड । प्रतिनिधी**

वैद्यनाथ सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने विजयी आघाडी घेतली आहे. विरोधी पक्षाच्या पॅनलला अनेक ठिकाणी खात सुद्धा उघडता आले नाही हे विशेष. मतमोजणी अखेर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली उतरलेल्या पॅनलने बाजी मारली आहे.

वैद्यनाथ बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी परळीपासून मुंबईपर्यंतच्या ३६ मतदान केंद्रांवर शनिवारी मतदान पार पडले. एकूण ४३ हजार ९६२ मतदारसंख्येपैकी १६ हजार २८७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून, एकूण मतदानाची टक्केवारी ३७.५ इतकी नोंदवली गेली आहे. नेहमीपेक्षा कमी मतदान झाल्याचे या निवडणुकीत दिसून आले. या निवडणुकीत एकूण १७ जागांसाठी स्पर्धा होती. त्यापैकी चार जागा आधीच पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलने जिंकल्या आहेत. उर्वरित १३ जागांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडली.

बँकेच्या १७ पैकी चार जागा बिनविरोध आल्याने उर्वरित १३ जागांसाठी मतदान झाले असून बँकेचे ४३ हजार ९६२ हजार सदस्य मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ६७ मतदान केंद्र आहेत. लातूर, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना, जळगाव, नाशिक, मुंबई, पिंपरी चिंचवड, सोलापूर जिल्ह्यात हे बूथ आहेत. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर सर्वसाधारण मतदार संघातून १२ जागांसाठी १४ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. तर निवडणुकीत महिला मतदार संघातून डॉ. प्रीतम गोपीनाथ मुंडे, माधुरी योगेश मेनकुदळे, ओबीसी मतदार संघातून अनिल तांदळे तर अनुसूचित जाती मतदार संघातून विनोद जगतकर हे बिनविरोध आले आहेत.

## बीडचा दिल्लीत डंका, खा. सोनवणेंच्या आक्रमक पावित्र्यामुळे सभागृह तहकूब

### केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर चर्चा करण्याची केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

सोमवारी मतचोरीच्या विषयावरून इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावेळी बीडचे खा. बजरंग सोनवणे आघाडीवर दिसले. दरम्यान, मंगळवारी सभागृहात याच विषयावर खा. बजरंग सोनवणे यांनी जोरदार आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा. सोनवणे हे पहिले सदस्य ठरले.




त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली. इंडिया आघाडी, ज्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार, राजद, भाकप (माले), शिवसेना (उबाठा), तृणमूल काँग्रेस आणि इतर पक्षांचा समावेश आहे. यांनी बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष व्यापक पुनरावलोकनाला तीव्र विरोध

▶ पान २ वर

### देशभरातील खासदारांचा पाठींबा

देशभरातील खासदारांनी खा. बजरंग सोनवणे यांच्या मागणीला पाठींबा दिला. यामुळे दल्लीत बीडच्या खासदाराचा डंका पहायला मिळाला. आजवर अशाप्रकारे आक्रमकबाणा दल्लीच्या सभागृहात बीडचा दिसला नव्हता. खा. सोनवणे यांनी सबंध देशाला बीडचा आक्रमक बाणा दाखवून दिला.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान, निवडणूक आयोगाच्या पक्षापाती व लहरी कारभारामुळे मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नावांची भरती करण्यात आली. याचा थेट सत्ताधारी पक्षाला फायदा झाला. यामु आयोगाच्या स्वायत्तेवर गंभिर प्रश्नचन्हि नर्माणि झाले आहे. आज संसदेत या विषयावर सर्वप्रमथ मीच आवाज उठविला. माझ्या समर्थनार्थ इंडिया आघाडी उतरली. लोकशाहीच्या रक्षणासाठी माझा लढा सुरूच राहिले.

**– खा. बजरंग सोनवणे, बीड**

# महाराष्ट्र आधार सेना आयोजित सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा : सुनिल थोरात

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त मागील आठ वर्षापासून होते सत्यशोधक पुरस्काराचे वितरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आधार सेनेच्या वतीने दिनांक १७ ऑगस्ट रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे सत्यशोधक पुरस्कार हा समाजातील शैक्षणिक, राजकीय, कला विज्ञान, साहित्य, क्रीडा, समाजसेवा, इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मागील आठ वर्षापासून दरवर्षीप्रमाणे या सत्यशोधक पुरस्काराचे वितरण केले जाते.



सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजक महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय दीपक भाऊ थोरात यांनी केलेले असून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांना हा पुरस्कार दिल्या जातो दरवर्षी प्रमाणे येत्या दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. अठरापगड जातीतील लोकांसाठी अहोरात्र काम करत असताना दीपक भाऊ थोरात यांनी लोकांच्या वेदना समजून घेऊन त्यांच्यासाठी आपले जीवन अर्पण केलेले आहे. दवाखान्यातील, पोलीस स्टेशन मधील, तहसील, पंचायत समिती किंवा इतर कुठलेही काम असो दीपक भाऊ थोरात निस्वार्थपणे कोणाकडून एक रूपयाची अपेक्षा न ठेवता करतात, समाजातील प्रश्न सोडवतात त्यामुळे काम करणाऱ्या माणसाच्या मागे खंबीरपणाने उभे राहिले पाहिजे जेणेकरून त्या माणसाला लढण्यासाठी अजून बळ मिळेल ऊर्जा मिळेल.

तसेच इतर लोकांनी पण आपले जीवन अर्पण केलेले असून त्यांच्या या कार्याला वाव मिळावा व त्यांच्या कार्याचे कौतुक व्हावे यासाठी दीपक भाऊ थोरात यांनी या सत्यशोधक पुरस्काराची संकल्पना राबवून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या लोकांना या पुरस्कारामुळे अजून बळ मिळेल व कौतुकाची थाप मिळेल या उद्देशाने हा पुरस्कार दिला जाणार आहे या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून या कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, अशी आवाहन सुनिल थोरात यांनी केले आहे.

# शेतकऱ्याच्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी

**युसुफवडगाव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कवडगाव शिवारी येथील उडानवस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्याच्या घरात दोन ते तीन अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा जवळपास ३९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना शनिवारी (दि. ९ ऑगस्ट) पहाटे घडली.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हनुमंत भिवसा बोरगे (वय ६०, व्यवसाय शेती, रा. कवडगाव, ता. केज, जि. बीड) हे रात्री सुमारे १.३० वाजता राहत्या घरी झोपलेले असताना, अज्ञात चोरट्यांनी घराच्या लोखंडी चॅनल गेटचे कुलूप तोडले. त्यानंतर त्यांनी बोरगे झोपलेल्या खोलीला बाहेरून कुलूप लावून दुसऱ्या खोलीतील लोखंडी कपाटाचे कुलूप तोडले आणि त्यातील ऐवज लंपास केला.

चोरट्यांनी सोन्याचे डाबेफुल व मणीमंगळसुत्र (किंमत ३३,२७८ रुपये), चांदीचे पैंजन (किंमत २,६५० रुपये) आणि ३,००० रुपये रोख अशी एकूण ३८,९२८ रुपयांची चोरी केली. या प्रकरणी युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गुरनं. २०५/२०२५, कलम ३३१(४), ३०५ बी.एन.एस. २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पो.हे.कॉ. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# गायरान नियमित करणे व इतर प्रश्नावर न.प.सीओ फडसे यांच्यासोबत सरात्मक चर्चा : अशोक वीर

**बीड । प्रतिनिधी**

गायरान धारकांचे प्रश्न आणि मुरमाची आवश्यकता, गायरान धारकांचा विषय अजित पवार आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांनी गायरान धारकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. बीड चे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी अतिक्रमण करणाऱ्या रहिवाशांच्या नावांची यादी मागितली आहे, ज्यामुळे गायरानावर राहणाऱ्या लोकांचे हक्क सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सर्व गायरान धारकांना पीटीआर (प्रमाणपत्र) देण्याचे आश्वासन दिले गेले आहे.ज्यामुळे त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारेल. चिखल झालेल्या ठिकाणी मुरमाची आवश्यकता याशिवाय, बार्शी नाका विभागातील काही भागात मुरमाची आवश्यकता असल्याबद्दल एक महत्त्वाचे निवेदन दिले गेले आहे. ढोले वस्ती, अशोक नगर, दुधाळ कॉलनी, प्रकाश आंबेडकर नगर, ढगे कॉलनी आणि इतर वसतींमध्ये रस्ते आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या मुरमामुळे स्थानिक नागरिकांचे



जीवन सुगम होण्यास मदत होईल. रस्ते बांधकामामुळे येथे शैक्षणिक व व्यावसायिक क्रियाकलापांना थोडी अधिक चालना मिळेल.

उपस्थित व्यक्ती या सर्व चर्चेच्या वेळी जेष्ठ नेते आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. ज्यात अशोक वीर, सचिन बोबडे, अमोल अहिरे, बबलू पवार, शेख जमील, अशोक वाघमारे यांचा समावेश होता. त्यांच्या सहकार्याने स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यात अधिक सुसंगतता आणण्याची अपेक्षा आहे. स्थानिक विकासासाठी सर्वांची एकत्रित भागीदारी आवश्यक आहे. योग्य व तात्काळ कारवाई करून रस्ते आणि इतर विकास कार्यांना गती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा कामांमुळे स्थानिक विकासाला ना केवळ धारणा मिळेल, तर रस्त्यांची स्थिती सुधारेल आणि त्याबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल. सर्व सहभागी व्यक्तींच्या एकजुटीमुळे आणि सुसंगत कार्यपद्धतीद्वारे स्थानिक समस्यांचे समाधान करणे शक्य होईल, हे विचारांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

# धारूर तालुक्यात चुलत भावंडांमध्ये वाद; दगडाने मारहाण, जीव घेण्याची धमकी

**धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आरणवाडी शिवारात चुलत भावंडांमध्ये वाद होऊन दगडाने मारहाण, शिवीगाळ आणि जीव घेण्याची धमकी दिल्याची घटना रविवारी (दि. ३ ऑगस्ट) सायंकाळी घडली. या प्रकरणी धारूर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता आबासाहेब माने (वय ३७, व्यवसाय शेती, रा. आरणवाडी, ता. धारूर) हे मोटारसायकलवरून धारूरकडे येत असताना, आरणवाडी शिवारातील आरोपींच्या घराजवळ पोहोचले. यावेळी आरोपी अशोक रावण माने यांनी दगडाने मारून त्यांना जखमी केले, तर आकाश अशोक माने यांनी त्यांच्या छातीत दगडाने मारले. त्यानंतर अशोक, आकाश आणि वेणुबाई अशोक माने (सर्व रा. आरणवाडी) यांनी मिळून शिवीगाळ, लाथाबुक्यांनी मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेबाबत उशिराने (दि. ११ ऑगस्ट) धारूर पोलिस ठाण्यात गुरनं. २९८/२०२५, कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) बी.एन.एस. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.हे.कॉ. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# दिंद्रुड येथील जलजीवन मिशन'च्या कामांची चौकशी करा नसता आत्मदहन करणार : अखिल सय्यद

## होलंबे कंत्राटदारकडून दिंद्रुडच्या कामात विलंब ४ कोटी ६८ लाख रुपये जलजीवनच्या कामात बोगसगिरी उघड

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशनअंतर्गत 'हर घर जल' या योजनेच्या माध्यमातून माजलगाव तालुक्यात दिंद्रुड येथे निकृष्ट दर्जाची कामे झाली आहेत. या कामांची चौकशी करण्यासाठी दिंद्रुड येथील रहिवासी अखिल सय्यद



यांनी बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

त्यात निकृष्ट दर्जाचे काम झाले असून स्थानिक बांधवांनी याबाबत सातत्याने विचारणा करूनही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे स्थानिकांची तक्रार आहे. तरी या कामांची तात्काळ तपासणी करून चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची अशी मागणी अखिल सय्यद यांनी या पत्राद्वारे केली आहे. मौजे दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे बोगस काम थांबत नसल्याकारणाने व अद्याप बीले उचलून देखील काम पूर्ण न झाल्याकारणाने १५ ऑगस्ट २०२५ रोजी आत्मदहन करणार असे अखिल सय्यद यांनी म्हंटले आहे.

वारंवार निवेदन देऊन सुद्धा प्रशासन दखल घेत नाही. जिल्हाधिकारी कार्यालय येथे सुद्धा निवेदनाद्वारे मागणी केली आहे.तरी सुद्धा कार्यवाही झाली नाही. २६ जानेवारी रोजी अखिल सय्यद ने जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. वारंवार लेखी निवेदन देऊन सुद्धा प्रशाशन टाळा टाळ करत आहे. लवकरात लवकर कारवाई न केल्यास १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहन करणार असे अखिल सय्यद यांनी म्हंटले आहे.

## तलवाडा गाव तलाव अतिक्रमण आठ दिवसात कारवाईचे गट विकास अधिकारीचे आदेश

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जलसमाधी आंदोलन स्थगित

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भिंती लगाट असलेले अतिक्रमण काढणे बाबत जलसमाधी आंदोलन दिनांक १५/८/२०२५ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी संबंधित प्रशासनास दिला होता. गाव पातळीवर ग्रामपंचायत, पोलीस स्टेशनसह गेवराई पंचायत समिति, तहसील प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय बीड, आयुक्तालय संभाजी नगर आस्या विविध ठिकाणी पाठ पुराव्या अंती तलवाडा पोलीस स्टेशनचे कर्तव्य तत्पर सपोनी मनोज निलंगेकर यांच्या मध्यस्थीने आंदोलन करते व संबंधित प्रशासनात १५ आगष्ट स्वातंत्र्य दिनाच्या आणुषंगाने विघ्न नको म्हणून समन्वय घडुन आला.

संदर्भायि बाबीचे गांभीर्य लक्षात लक्षात



घेऊन लागलीच तलाव संरक्षण भीती लगटच्या झालेल्या आतिक्रमण संदर्भात आठ दिवसाच्या आत कार्यवाही करण्याचे लेखी आश्वासन आंदोलन कर्त्यांना प्राप्त झाले. पोलीस प्रशासन व संबंधित प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन १५ आगष्ट रोजी चे जलसमाधी आंदोलन तुर्तास स्थगित करण्यात येत असुन पुढील कार्यवाहीच्या प्रतीक्षे नंतर संबंधित प्रशासना कडुन टाळाटाळ झाल्यास या पुढे त्रीव स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल आस्या प्रकारचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास दिला आहे. त्याच बरोबर तलवाडा या ठिकाणी ग्रामपंचायत स्तरावर सध्या कार्यरत आसलेल्या प्रशासकास या पुढे तलाव परिसरात कोणालाही आतिक्रमण न करु देण्याच्या कडक सुचना देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

# राज्यभरात होणार १५ हजार पोलीस भरती; राज्यमंत्री मंडळाचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील हजारो तरुणांची गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेली प्रतिक्षा आज अखेर संपली आहे. आज मंगळवारी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तब्बल १५ हजार पोलीसपदांच्या भरतीसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील पोलिस दलात तब्बल १५ हजार नवीन भरतींना मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला, याशिवाय मंत्रिमंडळाने आणखी चार महत्वाचे निर्णय घेतले आहे.

अन्न, नागरी पुरवठा विभाग राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये वाढ. सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत शिधा पत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण,



विमानचालन विभाग सोलापूर-पुणे-मुंबई हवाई प्रवासाकरिता निधी देण्याचा निर्णय. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत महामंडळांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतील जामीनदाराच्या अटी शिथिल. शासन हमीस पाच वर्षासाठी मुदतवाढ. पोलीस भरतीची स्वप्ने पाहणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आत्तापासूनच सज व्हायला हवे. शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि मुलाखत, या तिन्ही टप्प्यांसाठी सखोल तयारी करणे गरजेचे आहे. तसेच, भरतीची अधिकृत जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रिया नीट तपासावी. मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्याने भरती प्रक्रिया आता लवकरच सुरू होणार आहे. आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडत आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रत्यक्ष उपस्थित नसतील.

एकनाथ शिंदे हे सध्या श्रीनगरमध्ये आहेत. त्यामुळे ते या बैठकीला ऑनलाईन उपस्थित राहतील. तर शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावलेही आजच्या बैठकीला उपस्थित राहणार नाहीत. रायगड जिल्ह्यात १५ ऑगस्टला ध्वजारोहणाचा मान आदिती तटकरेंना दिल्याने जिल्ह्याचे पालकमंत्रीपद त्यांना दिले जाईल, अशी चर्चा आहे. त्यामुळे भरत गोगावले हे नाराज होऊन दिल्लीला गेल्याची चर्चा आहे. मात्र, भरत गोगावले यांनी दिल्लीत काही काम असल्याने आज मंत्रिमंडळ बैठकीला उपस्थित राहता येणार नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी नाराजीचे वृत्त फेटाळून लावले.

# बस प्रवासादरम्यान प्रवासी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण चोरी

**नेकनूर । प्रतिनिधी**

लातूर ते संभाजीनगर जाणाऱ्या बसमध्ये प्रवास करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना गुरुवारी (दि. ७ ऑगस्ट) दुपारी घडली. या प्रकरणी नेकनूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सविता निलेश काळे (वय ३५ रा. गांधीनगर, कळंब, जि. धाराशिव) या केज बसस्थानकातून बीड येथे जाण्यासाठी लातूर-संभाजीनगर बसने प्रवास करत होत्या. दुपारी साधारण ४.०० ते ४.३० वाजण्याच्या सुमारास नेकनूर ते मांजरसुंबा बसस्थानक प्रवासादरम्यान, अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील २१.१२० ग्रॅम वजनाचे (जुने वापरते) सोन्याचे गंठण, किंमत अंदाजे ७३,००० रुपये, चोरून नेले. या प्रकरणी नेकनूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोना राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

पान १ वरून...

## प्रभारी अधिकारी राजेश गडवे यांचा वाळू माफियांना तिसरा दणका

पळून गेला यावेळी एपीआय गडवे आणि पोलिस हवालदार येळे यांनी गावातील दोन पंच आणि उमापूर चौकीचे पोलिस हवालदार पवार यांना बोलावून स्पॉट पंचनामा करत ट्रॅक्टर जप्त केले. ही कार्यवाही केल्याने वाळू माफियांना चांगलाच दणका बसला असून एपीआय राजेश गडवे आणि पोलिस हवालदार येळे यांच्या कारवाईचे कौतुक होत आहे.

## बीडचा दिल्लीत डंका, खा. सोनवणेंच्या आक्रमक पावित्र्यामुळे सभागृह तहकूब

दर्शविला आहे. आघाडीचे म्हणणे आहे की हा उपक्रम गरीब, वंचित, अल्पसंख्याक आणि स्थलांतरित लोकसंख्येतील लाखो मतदारांना मताधिकारापासून वंचित ठेवण्याचा गंभीर धोका नर्माणि करतो. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान निवडणूक आयोगाच्या पक्षपाती आणि लहरी कारभारामुळे, मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करण्यात आला. या कारभाराचा थेट फायदा सत्ताधारी पक्षाला झाल्याचा आरोप खा. सोनवणे यांनी केला आहे. परिणामी, निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत गंभीर प्रश्नचन्हि नर्माणि झाले असून देशभरात असंतोषाची लाट उसळली आहे.

या असंतोषाच्या विरोधात कालपासून इंडिया आघाडीच्या ३०० पेक्षा अधिक खासदारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत मोर्चा काढला. या मोर्चात खा. बजरंग सोनवणे यांनी ठळकपणे सर्वांचे लक्ष वेधले. संसद सभागृहाबाहेर जोरदार निदर्शन सुरू असतानाच आज सभागृहात या विषयावर खा. बजरंग सोनवणे यांनी जोरदारपणे आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा. सोनवणे हे पहिले सदस्य ठरले. त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली.

# महाराष्ट्रातील पाच ज्योतिर्लिंगांचा इतिहास आणि श्रावणाचे महत्त्व

देवांचा देव महादेव आणि सगळ्यात भोळा नाथ म्हणून भगवान महादेवाची ओळख आहे. भगवान शंकराची आराधना करण्यासाठी श्रावण महिना पवित्र मानला जातो. श्रावण महिन्यामध्ये भगवान शंकराची आराधना करण्यासाठी सर्व लोक भगवान शंकराविषयी माहिती घेत असतात. पुराणामध्ये सांगण्यात आले आहे, की भगवान शंकर जिथे जिथे प्रकट झाले. त्या त्या स्थानावरती ही ज्योतिर्लिंग निर्माण करण्यात आलेली आहेत. देशामध्ये अशी बारा ज्योतिर्लिंगे आहेत. तर महाराष्ट्रात त्यातली पाच ज्योतिर्लिंगे आहेत.

**वैजनाथ परळी –** परळी वैजनाथ हे बारा ज्योतिर्लिंग मंदिरांपैकी एक आहे. हे ज्योतिर्लिंग भारतातील महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात असून परळी वैजनाथ हे दक्षिण मध्य रेल्वेवरील एक स्थानक आहे. परळी वैजनाथ हे परळी वैद्यनाथ म्हणूनही ओळखले जाते. महाशिवरात्रीच्या दिवशी वैद्यनाथ जयंती असते. तसेच ते परळी वैजनाथ तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे. परळी येथील वैद्यनाथ मंदिर प्रसिद्ध असून भारतातील १२ ज्योतिर्लिंगात परळीच्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे स्थान जागृत समजले जाते. हे मंदिर देवगिरीच्या यादवांच्या काळात त्यांचा प्रधान श्रीकरणाधिप हेमाद्री याने बांधले आहे, असे म्हणतात. पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. हे मंदिर चिरेबंदी असून भव्य स्वरूपाचे आहे. मंदिराच्या परिसरात लांबलचक असलेल्या पायऱ्या व भव्य प्रवेशद्वार ही लक्ष वेधून घेण्यासारखी ठिकाणे आहेत. मंदिराचा गाभारा व सभामंडप हे एकाच पातळीवर असल्यामुळे सभामंडपातून ज्योतिर्लिंगाचे दर्शन होऊ शकते. इतरत्र कोठेही नाही, पण फक्त वैद्यनाथ इथे देवाला स्पर्श करून दर्शन घेता येते. त्याशिवाय मंदिर परिसरात तीन मोठी कुंडे आहेत. मंदिरापासून जवळच तीन



किलोमीटर अंतरावर ब्रह्मनदीच्या किनारी ३०० फूट उंचावरील जिरेवाडी येथे सोमेश्वर मंदिर आहे. अंबेजोगाईपासून परळी वैजनाथ २५ किलो मीटर अंतरावर आहे. तर परभणीपासून ६० किलो मीटर अंतरावर आहे. या ठिकाणांपासून वैजनाथला जाण्यासाठी वाहनांची चांगली सोय आहे. परळी येथे एक औष्णिक विद्युतकेंद्र देखील आहे.

**नागनाथ हिंगोली –** बारा ज्योतिर्लिंग हे भारतातील हिंदूंचे तीर्थक्षेत्र आहेत. त्यातील पाच महाराष्ट्रात आहेत. शतकानुशतके या ठिकाणी भगवान महादेवांची पूजा करतात. औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग हे त्यापैकी एक आहे. नागनाथ हिंगोली जिल्ह्यातआहेत. १२ ज्योतिर्लिंगांपैकी हा आठवा मानला जातो. म्हणून या तीर्थस्थानाला महत्व प्राप्त झाले आहे. असे मानले जाते की, युधिष्ठिर याने हस्तिनापूरचान १४ वर्षे त्याग केला होता. नागनाथ मंदिरात उत्तम दर्जाचे कोरीव काम आहे. मंदिर हेमाडपंती वास्तूशिल्प असून सुमारे ६०,००० चौरस फूट क्षेत्रावर स्थित आहे. शिवरात्री आणि विजयादशमीवर मोठ्या संख्येने यात्रेकरू या मंदिरात येतात.

**घृष्णेश्वर औरंगाबाद –** औरंगाबाद जिल्ह्यातील दौलताबादपासून सुमारे ११ किलो मीटर अंतरावर आणि वेरूळ लेण्यांजवळ घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आहे. शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांत या ठिकाणांचे उल्लेख मिळतात.वेरूळ गावातील येलगंगा नदीजवळ हे मंदिर असून मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा प्रथमतः १६ व्या शतकात जीर्णोद्धार केला. त्यानंतर १७३० मध्ये मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमीबाईंनी परत एकदा जीर्णोद्धार केला. मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. या मंदिराचे नक्षीकाम अवर्णनीय आहे. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती सुधर्मा आणि पत्नी सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते. परंतु सुधा कधीही आई होऊ शकत नव्हती. म्हणून सुधाने तिची धाकटी बहीण घुश्मासोबत पतीचे लग्न लावले. वेळ गेला आणि धाकट्या बहिणीने एका सुंदर मुलाचा जन्म झाला. हळू हळू सुधाच्या मनात ईर्षेची बीजे निर्माण झाली . एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि ज्या तळ्यामध्ये घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. त्याचा मृतदेह दफन केला. घुश्माला या गोष्टीचे वाईट वाटले पण तिने शिव आराधन सुरू ठेवली एके दिवशी शिवलींग तळ्यात विसर्जीत केल्यावर तिला मुलगा जिवंत बाहेर आल्याचे दिसले. शंकराने तिला तिच्या भक्तीचे फळ दिले होते.

**त्र्यंबकेश्वर नाशिक –** त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग हे भारतातील एक प्राचीन तीर्थस्थान आहे. सर्व १२ ज्योतिर्लिंगापैकी हे विशेष आहे. हे मंदिर नाशिक शहरापासून २८ किमी अंतरावर सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यात स्थित आहे. पवित्र गंगा गोदावरी नदीचे उगमस्थान त्र्यंबकेश्वराच्या जवळ आहे. मंदिर प्रांगणाच्या जवळच कुशावर्त तीर्थ आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलींचे मोठे बंधू श्री निवृत्तीनाथ महाराजांची समाधी देखील त्र्यंबकेश्वर मध्येच आहे. त्र्यंबकेश्वर मध्ये अनेक धार्मिक संस्था देखील आहेत ज्या वेदशाळा, संस्कृत पाठशाळा, कीर्तन पाठशाळा, प्रवचन संस्था चालवितात. पौराणिक कथेनुसार असे सांगितले जाते की, ब्रह्मदेवांनी इथे एका पर्वतावर श्री महादेवांना प्रसन्न करण्यासाठी तप केले. जे पुढील काळात ब्रह्मगिरी पर्वत नावाने विख्यात झाले. या पर्वतावर एके काळी गौतम ऋषींचे आश्रम होते. केलेल्या अपराधातून मुक्तता मिळावी म्हणून त्यांनी कठोर तपश्चर्या केली आणि महादेवांना प्रसन्न केले. गौतम ऋषींच्या तपश्चर्येवर प्रसंन्न होऊन महादेवांनी त्रिमूर्ती ज्योतिर्लिंग स्वरूप धारण केले आमि तिथेच विराजमान झाले. तेव्हापासून हे स्थान त्र्यंबकेश्वर म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्योतिर्लिंग हा शब्द प्रकाशस्तंभ दर्शवतो. त्र्यंबकेश्वर शिवलिंगाची वास्तविक रचना इतर ११ ज्योतिर्लिंगांपेक्षा वेगळी आहे. त्र्यंबकेश्वर येथे शिवपिंडीमध्ये अंगठ्याच्या आकाराच्या तीन कपार आहेत. ज्यात त्रिमूर्ती म्हणजेच ब्रह्मा-विष्णु-महेश विद्यमान आहेत. या ज्योतिर्लिंगाची त्रिकाल पूजा केली जाते जी स्थानिक माहितीप्रमाणे ३५० वर्षांपासून सुरू आहे.

**भीमाशंकर पुणे –** या ज्योतिर्लिंगामधून पश्चिमी महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांपैकी एक अशी भीमा नदी उगम पावते. भीमाशंकर हे ठिकाण सह्याद्रीच्या प्रमुख रांगेत असून अतिशय घनदाट अरण्यात आहे. हेमाडपंथी पद्धतीचे हे मंदिर सुमारे १२०० ते १४०० वर्षांपूर्वीचे आहे. मंदिराच्या छतावर, खांबावर सुंदर नक्षीकाम आढळते. मंदिरावर दशावताराच्या कोरलेल्या मूर्ती रेखीव व सुंदर आहेत. सभामंडपाबाहेर सुमारे पाच मण वजनाची असलेली लोखंडी घंटा आहे. चिमाजी अप्पांनी ही घंटा भेट दिल्याचे सांगण्यात येते. या घंटेवर १७२९ अशी इंग्रजीत नोंद आहे. हेमाडपंती पद्धतीचे बांधकाम असलेल्या या मंदिराचा जीर्णोद्धार व नवे बांधकाम केल्यामुळे मूळ मंदिर बघण्यास मिळत नाही. मंदिराचा भव्य सभामंडप, उंच कळस, डोंगर उतरल्याशिवाय दिसत नाही. शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज येथे भीमाशंकराच्या दर्शनास येत असतात. पेशवे बाळाजी विश्वनाथ हे देखील येथे दर्शनासाठी आल्याच्या नोंदी आहेत. नाना फडणवीसांनी शिखरासह या मंदिराचा जिर्णोद्धार केला होता. सभामंडपाशेजारी दर्शनासाठी लोखंडी रांगा तयार केल्या आहेत.

आरंभ
# बीड जिल्हा
मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५


# गोरगरीबांच्या अतिक्रमणावर हातोडा; भुमाफियांना पायघड्या? समान न्याय कुठं आहे?

## प्रशासनाच्या दुटप्पी धोरणाविरोधात मक्याचे कणसं भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील जिल्हा आणि नगरपालिका प्रशासन अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत हातावर पोट भरणाऱ्या चहा-नाष्टा चालक, टपरीधारक, फळ विक्रेते, फुलहार विक्रेते अशा गोरगरिबांवर निर्दयपणे कारवाई करत आहे. मात्र शहरातील राखीव खुल्या जागा आणि बिंदुसरा नदीपात्रात भुमाफियांची बेकायदेशीर बांधकामे मात्र विनाविघ्न सुरूच आहेत. शहरातील रस्त्यांच्या मधोमध उभे असलेले विद्युत रोहित्र, विजेचे खांब, चौकाचौकात ठाण मांडून बसलेली मोकाट जनावरे, तसेच खड्ड्यांनी भरलेले रस्ते या सर्व समस्यांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला.



या दुटप्पी धोरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.१२, मंगळवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मक्याची कणसे भात्यावर भाजुन मोफत वाटप करत लक्ष्यवेधी आंदोलन आले. जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी नगरपालिका बीड यांच्या मार्फत पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, शेख मुबीन, शेख मुस्ताक, शिवशर्मा शेलार, पांडुरंग हराळे, रामधन जमाले, रामनाथ खोड, बाळासाहेब मोरे, माजी सैनिक अशोक येडे, आप्पासाहेब मतकर, मोमीन रफीक, दिलीप जोशी, मोमीन आरबाझ, प्रा.डी.जी.तांदळे, मोमीन अलतमश, आदींचा सहभाग होता.

**वाहतुकीस अडथळे; पण प्रशासन मौन**

शहरातील मुख्य रस्त्यावरील नाल्यांवर किंवा रस्त्याच्या बाजूला अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करताना, रस्त्यांच्या मधोमध असलेले विद्युत रोहित्र, विजेचे खांब, तसेच मोकाट जनावरे आणि कुत्रे याकडे मात्र प्रशासन दुर्लक्ष करत आहे. परिणामी वाहतुकीत अडथळे निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण वाढत आहे.

### राखीव जागा गिळंकृत; भुमाफियांवर कारवाई कधी?

शहरातील मंदिर, उद्यान आदींसाठी राखीव खुल्या जागा काही नगररचनाकार, भू-अभिलेख अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मिलीभगतीने काही भुमाफिया व पदाधिकाऱ्यांनी बेकायदेशीररीत्या स्वतःच्या नावावर करून घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणात बनावट झढठ व झठ कार्ड तयार करण्यात आल्याचे उघड झाले असून तक्रारीनंतर केवळ समिती नेमण्यापुरतेच काम झाले. १५ दिवसांत अहवाल देण्याचे आश्वासन देऊनही ४.५ महिने उलटून कारवाई झाली नाही. तसेच बिंदुसरा नदीपात्रातील अनधिकृत बांधकामांवर विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी कारवाईचे आदेश दिले असतानाही, नगरपालिका प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे समाजात उत्कृष्ट कामगिरी करण्याचा सन्मान सोहळा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उपमुख्यमंत्री अजितदादा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष तटकरे, माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीचे ट्रॉफी, शाल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये आर.पी.तोंडे (कार्यकरी अभियंता), शेख जलिल शेख रशीद (केंद्र प्रमुख जिल्हा परिषद), डॉ. अमोल भिमराव बनसोडे (दंत शल्य चिकित्सक), खान मोहम्मद रईस (एम.एस. इंग्लिश स्कूल), नरसिंह चानंय् कोकानडे (मुकादम जिल्हा रुग्णालय), शेख उरूस कायनात (उपप्राचार्य एम.एस. इंग्लिश स्कूल), इनामदार फैसलोदिन अलिमोदिन शिक्षक(एम.एस. इंग्लिश स्कूल), शेख वजिहा मुजफ्फर जहागिरदार (सौन्दर्य अणि आरोग्य सल्लागार), फराह सय्यद अमिन (शिक्षक भगवान इंग्लिश स्कूल), शेख गाझी (वाहन चालक बांधकाम विभाग) यांना सन्मानित करण्यात आले.

त्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम भाई, राष्ट्रवादी महिला आयोग जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, विद्यार्थी युवक सेनेचे जिल्हाध्यक्ष इंजि अजिंक्य आणेराव, युवती जिल्हाध्यक्ष प्रियाताई डोईफोडे, कार्यक्रमाचे सुंदर नियोजन करणाऱ्या युवा जिल्हा सचिव नुजत ताई, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्याध्यक्ष शालिनीताई परदेशी यांनी केले तसेच आभार प्रदर्शन जिल्हा सचिव अनुराधाताई प्रकाश यांनी केले त्याचबरोबर अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शाकेरा ताई, अर्चनाताई देशमुख, नंदिनीताई ओव्हाळ, नीताताई कांबळे, योजना ताई स्वामी, राणी शेख आदी महिला उपस्थित होत्या.

**दशनाम गोसावी समाज परिषदेच्या राज्य अध्यक्ष पदी ओमप्रकाश गिरी, जिल्हाध्यक्ष महंत दत्तात्रय गिरी महाराज तर युवा जिल्हाध्यक्ष रवि बन**

## गेवराई तालुका युवा अध्यक्ष पदी बाळासाहेब गिरी यांची सर्वानुमते निवड!

**तलवाडा । प्रतिनिधी**

आज बीड मधील ग्रामसेवक भवन येथे दशनाम गोसावी समाज परिषदेची कार्यकारिणी बैठक झाली, जिल्हास्तरीय कार्यकारिणी बैठकीस प्रमुख मान्यवर ड जे.बी.गिरी (जिल्हाध्यक्ष परभणी), डॉ. मकरंद गिरी (जिल्हाध्यक्ष लातूर) यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली. सुरवातीला आलेल्या मान्यवरांचे सन्मान करण्यात आला त्यानंतर ओमप्रकाश गिरी सर यांनी माघील पाच वर्षांचा कामाचा अहवाल सादर केला,त्यानंतर संस्थापक/ अध्यक्ष ड राजेंद्र बन साहेब यांनी आलेल्या पदाधिकारी यांचे स्वागत केले, त्यानंतर सर्वानुमते निवड जिल्हाकारणी पदे देण्यात आली.




संघटनेचे मार्गदर्शक म्हणून प्रकाश पुरी साहेब, शिवाजी भारती साहेब, शिवाजी गिरी साहेब, तात्यासाहेब बन साहेब, प्रभाकर गिरी, बबन पुरी, रामनाथ तात्या बन, हनुमंत गिरी, गणपत गिरी महाराज, महारुद्र गिरी यांनी नियुक्ती करण्यात आली. ओमप्रकाश गिरी सर यांची महाराष्ट्र राज्य अध्यक्ष पदी म्हणून सर्व पदाधिकारी व समाज बांधवांनी सर्वानुमते निवड केली, त्यानंतर जिल्हाध्यक्ष- महंत ह.भ.प दत्तात्रय महाराज गिरी, जिल्हा उपाध्यक्ष- आसाराम गिरी सर (धारूर) व कॅप्टन प्रभाकर गिरी गेवराई, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र पुरी, जिल्हा कार्याध्यक्ष बबन गिरी व संजीव भारती, जिल्हा सचिव विवेकानंद गिरी, कर्मचारी जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर गिरी, कर्मचारी जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप गिरी सर व प्रा. तात्यासाहेब पुरी, युवा जिल्हाध्यक्ष रवि बन, युवा जिल्हा उपाध्यक्ष सचिव गिरी, युवा कार्याध्यक्ष बाजीराव गिरी सर यांची जिल्हाकारणी मध्ये निवड करण्यात आली.

त्यानंतर आष्टी तालुका अध्यक्ष उमेश बन, ता.सरचिटणीस ज्ञानेश्वर बन, बीड तालुका अध्यक्ष ऋषी गिरी, ता.उपाध्यक्ष संतोष गिरी, ता.बीड युवा अध्यक्ष मनोज गिरी, धारूर तालुका अध्यक्ष वैजनाथ भारती, ता.उपाध्यक्ष अनुरध गिरी, सचिव विलास पुरी, गेवराई तालुका अध्यक्ष सोमनाथ पुरी, उपाध्यक्ष निलेश भारती, कोषाध्यक्ष सुनील पुरी, युवा अध्यक्ष बालासाहेब गिरी, ता.सरचिटणीस सचिन पुरी, पाटोदा तालुका अध्यक्ष मारूती गिरी यांची तालुका कार्यकारिणी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे, त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले, आभार दिलीप गिरी सर यांनी मानले.



आज वाघाळा अंबाजोगाई येथे प्रहार जनशक्ती पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विलास काळुंके यांच्या प्रमुख उपस्थित शेतकरी कर्जमाफी व दिव्यांग मच्ची मार मेंडपाळ शेतमजूर यांच्या मागण्यासाठी गावात जाऊन जनजागृन व येणाऱ्या काळात मोठे आंदोलन करण्यासाठी बैठक संपन्न झाली. उपस्थित अशोक सोनवणे उबाठा शिवसेना नेते वसंत माने, प्रहारचे कार्यकर्ते पांडुरंग आराध्य, भारत जाधव व गावातील शेतकरी दिव्यांग बांधव मोट्या संख्येने उपस्थित होते.



जेष्ठ मार्गदर्शिका, चळवळीतील एक खंबीर नेतृत्व प्रा.सुशीलाताई मोराळे यांच्या वाढदिवसानिमित्त पेन आणि नोंदवही देऊन त्यांचा यथोचित सन्मान करून शुभेच्छा देताना भाजपा राज्य परिषद सदस्य ॲड.सर्जेराव तांदळे, अमर सानप उपस्थित होते.

## आज गेवराईत रुद्राभिषेक लिंगार्चन सेवा भाविकांनी लाभ घ्यावा : स्वरूपाताई रोहित पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक यांच्या वतीने सुप्रजन्यवृष्टी व राष्ट्र कल्याण अर्थ श्री रुद्र लिंगार्चन सोहळा व दादासाहेब यांचा मराठवाडा दौरा आज दि १२ ऑगस्ट २०२५ रोजी गेवराई येथे होणार आहे. याचा स्वामी समर्थ भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सौ स्वरूपाताई रोहित पंडित यांनी केले आहे.

परमपूज्य गुरुमाऊली च्या आशीर्वादाने गुरुपुत्र दादासाहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दिनांक १२ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी श्रावण मासानिमित्त गेवराई येथील कोल्हेर रोड वर असलेल्या भाग्यश्री लक्ष्मी लॉन्स येथे सायंकाळी ५ ते ६ या वेळेत रुद्राभिषेक लिंगार्चन सेवा सोहळ्याचे आयोजन करण्यात आला आहे. यावेळी श्री दादासाहेब यांचे हितगुज होणार असून, श्री चिंतेश्वर संस्थांचे मठाधिपती दिलीप महाराज घुगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास श्री स्वामी समर्थ भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सौ स्वरूपाताई रोहित पंडित यांनी केले आहे.

## आता महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी होणार आयएएस, आयपीएस : डॉ. संतोष मुंडे

### न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्रातील महावितरण व महापारेषण विभागात निवड झालेल्या ५१ विद्यार्थ्यांचा सत्कार

**परळी । प्रतिनीधी**

परळी शहरातील न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्रातील एकूण ५१ विद्यार्थ्यांची महावितरण व महापारेषण मध्ये निवड झाल्याबद्दल साई पॅलेस परळी वैजनाथ येथे घेण्यात आलेल्या सत्कार समारंभाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी संकल्प अभ्यासिका व करिअर अकॅडमीचे अशोक मुंडे, पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा चे सहशिक्षक प्रा.डॉ. नरेश काळे, न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक विजय वाघमारे तसेच पत्रकार कैलास डूमने व धीरज जंगले यांची प्रमुख उपस्थिती होती.



उद्घाटनानंतर महावितरण व महापारेषण मध्ये सरकारी नोकरीत निवड झालेल्या ५१ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे व मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिव्यांग कल्याण मंत्रालय अध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राच्या या उत्तुंग यशाबद्दल केंद्राचे संचालक विजय वाघमारे सर तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व अशा स्पर्धा परीक्षा केंद्रांमुळे आता महाराष्ट्रातील जास्तीत जास्त विद्यार्थी आयएएस, आयपीएस होणार यात शंका नाही असे उद्गार काढले आणि सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रात आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडा आणि यावरच न थांबता उच्च पदावर विराजमान व्हा असे आव्हानही केले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा चे सहशिक्षक काळे सर तसेच संकलप अभ्यासिका चे अशोक मुंडे सर यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.शेवटी न्यू संकल्प स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक विजय वाघमारे सर यांनी अध्यक्षीय समारोपात सर्व यशस्वी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## ई-पीक पाहणी प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना होत आहेत अडचणी

**केज । प्रतिनिधी**

खरिपातील शेतकरी स्तरावरील ई-पीक १ ऑगस्टपासून सुरू झाली आहे.




परंतु ई-पीक पहाणी करताना (डी.सी.एस.) मोबाईल ॲपद्वारे (व्हर्जन ४.०) नोंदणी लॉगिन साठी अडथळे येत आहेत. केज तालुक्यातील शेतकऱ्यांची ई - पिक पेरा नोंदणीची प्रक्रिया अडखळली आहे.

महसूल विभागाकडे आजवर केलेल्या ई-पिक पेऱ्याची नोंदणीची आकडेवारी उपलब्ध आहे की नाही हे सुद्धा कृषी सहाय्यक गावात येऊन सांगत नाहीत. महसूल विभागाअंतर्गत जमाबंदी आयुक्त संचालक भूमिलेखमार्फत माझी शेती माझा सातबारा मीच नोंदविणार माझापीक पेरा या संकल्पनेनुसार ई-पीक पहाणी प्रणाली राबवली जात आहे. तरी ई-पीक प्रणाली साठी महसूल विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

## १६ ऑगस्टपासून डोईफोडवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे श्री गुरु बंकट स्वामी महाराज, राष्ट्रीय संत भगवान बाबा, श्री गुरु एकनाथ बाबा, श्री गुरु वामन भाऊ व माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प रतन महाराज मठाधिपती श्रीक्षेत्र सासरा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गावकऱ्यांच्या मेहनतीने, सहकार्याने १६ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताहाची गणेश पूजन आणि सुरुवात होत आहे.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, डोईफोडवाडी सामाजिक व धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व भक्तिमय वातावरणाने पार पाडले जातात. त्यापैकीच हा एक कार्यक्रम या सप्ताहात काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन आणि निरनिराळ्या गावचे जागर आयोजित केले आहेत.

कीर्तन सेवेमध्ये अनुक्रमे ह भ प पुरुषोत्तम महाराज शास्त्री शिवरामपुरी मठ संस्थान विडा, ह भ प शांतिब्रह्म महादेव महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडी, ह भ प उद्धव महाराज चोले श्रीक्षेत्र खडकी, ह भ प केशव महाराज घुले शास्त्री टाकळी, ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी व्याकरणाचार्य वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र होळ, ह भ प आप्पासाहेब चौरे महाराज श्रीक्षेत्र चोंडी तालुका धारूर, ह भ प भागीरथी बाबा श्रीक्षेत्र टाकळी जिल्हा अहिल्यानगर या सर्व कीर्तनकारांचे कीर्तन संध्याकाळी नऊ ते अकरा या वेळेत संपन्न होईल व शेवटी २३ ऑगस्ट या दिवशी ह भ प रतन महाराज सासुरेकर मठाधिपती श्रीक्षेत्र सासुरा यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. वरील सर्व कार्यक्रमाचा लाभ तालुक्यातील सर्व मंडळींनी घ्यावा असे आव्हान समस्त गावकरी मंडळ डोईफोडवाडी यांनी केले आहे अशी माहिती मा सरपंच तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.



## नेत्ररोग चिकित्सा व तपासणी शिबीरास प्रतिसाद; ४५१ रुग्णांची मोफत तपासणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील अंकुर प्रतिष्ठान व संशोधन संस्थेच्या वतीने आयोजित नेत्ररोग चिकित्सा व शस्त्रक्रिया शिबीरास मोठा प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी राजेसाहेब देशमुख (माकेगांवकर) होते. शिबीराचे उद्घाटन पद्मश्री डॉ.त्यात्याराव लहाने, स्वा.रा.ती.रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, स्वा.रा.ती. रूग्णालयातील डॉ. ज्ञानोबा दराडे, डॉ. एकनाथ शेळके, डॉ. दत्तात्रय शिंदे, डॉ.अमित लहाने, डॉ.प्रफ्फुल पानसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बालासाहेब लोमटे, डॉ. अभिजित अंजान, डॉ. अजय ठोंबरे, डॉ.निता टोणगे, बालरोग तज्ञ डॉ. कौस्तुभ कुलकर्णी, स्त्री रोगतज्ञ डॉ.गौरी कुलकर्णी, नेत्ररोग तज्ञ डॉ.स्नेहल पेस्टे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.राजाभाऊ धाट, कार्यवाह सुभाष देशपांडे, समन्वयक सुधीर धर्माधिकारी आदी उपस्थित होते. रुग्णांना चांगली दृष्टी प्राप्त व्हावी आयुष्याच्या उत्तरार्धात दिलासा मिळावा या उद्देशाने नेत्र तपासणी चिकित्सा, शस्त्रक्रिय शिबीराच आयोजन करण्यात आल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. रुग्णसेवा ही डॉक्टरांचा धर्म असून ते करण्याचे भाग्य व संधी मिळाल्याचे डॉ.लहाने यांनी सांगितले.

रुग्णाची सेवा करणारे डॉक्टर हे प्रत्यक्ष देवमाणसं आहेत असे मत अध्यक्षीय समारोपात राजेसाहेब देशमुख यांनी व्यक्त केले. सण उत्सव असतानाही मोफत नेत्ररोग शिबीरासाठी मोठ्या संख्येने रुग्ण सहभागी झाल्याचे प्रास्तविकातून राजाभाऊ धाट यांनी सांगितले. शिबीरात ४५१ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. संचालन आरती कुलकर्णी यांनी तर आभार सुभाष देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी पेशवा संघटनेचे पदाधिकारी, अंकुर प्रतिष्ठानचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# डोळे उघडे असलेली न्यायदेवता

शतकानुशतके न्यायदेवतेची डोळ्यांवर पट्टी बांधलेली मूर्ती, एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात तलवार धरलेली, ही न्यायाची पारंपरिक प्रतिमा राहिली आहे. परंतु आता ही प्रतिमा इतिहासजमा होत आहे. वसाहतकालीन छायेतून बाहेर पडत भारताने स्वतःच्या सांस्कृतिक प्रतीकांचे आलिंगन घेतले आहे. नवी 'न्यायदेवी' साडी परिधान केलेली, डोळे पूर्णपणे उघडे ठेवून उभी आहे. एका हातात तराजू आणि दुसऱ्या हातात भारतीय राज्यघटना आहे. भारताचे मुख्य न्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी नुकतीच ही मूर्ती सर्वोच्च न्यायालयात अनावरण केली.

कायदा आंधळा आहे ही पाश्चात्त्य प्रतिमा अनेक पिढ्यांपासून रूजलेली आहे. ही धारणा बदलण्यासाठी वेळ आणि जनजागृती लागेल. पश्चिमी वस्त्रप्रावरणाऐवजी साडी आणि भारतीय अलंकारांनी सजलेली ही मूर्ती वसाहतकालीन प्रभावांपासून मुक्ततेचे प्रतीक मानली जात आहे.

ही बदलाची दुसरी पायरी आहे, नुकतेच भारतीय दंड संहिता, दंड प्रक्रिया संहिता आणि पुरावा कायदा यांची जागा अनुक्रमे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम यांनी घेतली आहे. भारतीय परंपरा आणि संस्कृती जगातील सर्वात प्राचीन आहेत. त्यामुळे हा बदल फक्त इतिहासाला सलाम नाही, तर आपली ओळख आणि मूल्यांचे पुनर्स्थापन आहे.



**द्रुत दृष्टीक्षेप:**

न्यायदेवतेची संकल्पना रोमन पौराणिक कथांतील जस्टिटिया या देवीतून आली आहे. मूळ प्रतिमेत तलवार, तराजू आणि डोळ्यांवरील काळी पट्टी होती. पुनर्जागरण काळात (१४वे शतक) ही पट्टी व्यंगात्मक स्वरूपात लावली गेली, ज्याने भ्रष्ट न्यायप्रक्रियेवर टीका केली. कालांतराने ही पट्टी निष्पक्षतेचे प्रतीक मानली जाऊ लागली.

भारतात ही पट्टी अनुच्छेद १४ - कायद्यापुढे समानता व कायद्याचे समान संरक्षण - या संकल्पनेशी निगडित आहे. यावरूनच सामान्य माणसात कायदा आंधळा असतो ही संज्ञा प्रचलित झाली. अहमदनगर येथील न्यू लॉ कॉलेजची विधी विद्यार्थिनी सय्यद फिजा सिद्दिक सय्यद सांगते की, पारंपरिक न्यायदेवता पाश्चात्त्य पोशाखात, तलवार व तराजू हातात घेतलेली असते, जी न्याय व शक्तीचे प्रतीक आहे. पण नव्या प्रतिमेत साडीतील न्यायदेवता तलवारीऐवजी भारतीय राज्यघटना धरते, जी भारतीय सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडली गेलेली आहे व न्यायव्यवस्थेत संविधान सर्वोच्च असल्याचे अधोरेखित करते.

**नवीन दिशा:**

डोळ्यांवरील पट्टी काढून टाकून उभी केलेली नवी न्यायदेवता भारतीय न्यायव्यवस्थेला नवी वाट दाखवते. ही प्रतिमा अधिक संवेदनशील, समावेशक आणि जनकेंद्री न्यायव्यवस्था दर्शवते. पारंपरिक आंधळेपणाऐवजी सजग, जागरूक आणि संविधानमूल्यांवर आधारित न्यायाचे हे प्रतीक आहे.

**आंधळा कायदा:**

कायदा आंधळा असतो ही म्हण आता नव्या दृष्टीकोनातून पाहावी लागेल. तलवारीऐवजी राज्यघटनेचे पुस्तक ही शक्तीपेक्षा ज्ञानाचे वर्चस्व दर्शवते. ही नवी प्रतिमा सामाजिक असमानता ओळखून, तरीही संविधानिक मूल्ये जपणाऱ्या न्यायाची जाणीव करून देते.

**निष्कर्ष:**

साडीतील आणि राज्यघटनेला हातात धारण केलेली न्यायदेवता ही भारताच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. ती संविधानिक सर्वोच्चत्वाचे अधोरेखन करते आणि वसाहतकालीन प्रतीकांपासून मुक्ततेची जाणीव करून देते.

**लेखिका -**
**सय्यद फिजा सिद्दिक सय्यद**
(बी.ए. एल.एल.बी. - तृतीय वर्ष)
न्यू लॉं कॉंलेज, अहिल्यानगर

# गेवराई पं.स.च्या माजी सभापतीच्या पतीकडून महिला कर्मचाऱ्यावर अत्याचार?

## लैंगिक अत्याचारांचा व्हिडिओ-फोटो व्हायरलची धमकी; पतीपासून घटस्फोट, शहरात कैद, नंतर तिच्यासह मुलांना जीवे मारण्याची धमकी?



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई पंचायत समितीच्या माजी सभापतीच्या पतीने महिला कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढण्याची धमकी देत तिच्यावर रेल्वेस्टेशन भागातील हॉटेलसह, नाशिक, नगर येथे नेऊन वारंवार अत्याचार केला.

तिचे फोटो, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पतीपासून घटस्फोट घ्यायला लावला. शहरात राहण्यास भाग पाडले. त्यानंतर तिच्यासह मुलांना जीवे मारण्याच्या धमक्या देऊन गारखेडा भागातील घरासमोर गोंधळ घातला. हा प्रकार १४ सप्टेंबर २०२२ ते २ जुलै २०२५ या काळात घडला. १ ऑगस्ट रोजी बीड येथे गुन्हा दाखल होऊन वेदांत नगर ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.

दीपक प्रकाश सुरवसे (रा. खांडवी, ता. गेवराई, जि. बीड) असे आरोपीचे नाव आहे. ३५ वर्षीय पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, ती सहा वर्षांपूर्वी गेवराई पंचायत समितीमध्ये नोकरीला लागली. तेव्हा पंचायत समितीच्या सभापती म्हणून दीपक सुरवसेची पत्नी कार्यरत होती. मात्र, दीपक हाच पंचायत समितीच्या कार्यालयात बसून कामकाज पहायचा. कर्मचाऱ्यांना तो सूचना देत असल्याने तेव्हा पीडितेची त्याच्याशी ओळख झाली.

सप्टेंबर २०२२ मध्ये सुरवसेने पीडितेला फोन करून रेल्वेस्टेशन भागातील हॉटेल विट्स येथे बोलावले. कामाचे बोलणार असेल या समजुतीतून पीडिता गेली. तेव्हा सुरवसेने तिच्यावर जबरदस्ती केली. विरोध करताच नोकरी गमवावी लागले अशी धमकी दिली. पीडितेने आरडाओरड केली मात्र, तिचा आवाज बाहेर गेला नाही. सुरवसेने तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर सुरवसेने फोटोसुद्धा काढले असून कोणाला काही सांगितले तर नोकरी घालविल आणि तुझ्या घरी सांगेल अशी असे धमकावले. अधिक तपास महिला उपनिरीक्षक संगीता गिरी करत आहेत.

### पीडितेच्या पतीला मारण्याचा कट रचला?

सुरवसेने पीडितेच्या पतीला मारण्याचा कट रचला. असाच धाक दाखवून त्याने मे २०२५ मध्ये पीडितेला पतीपासून घटस्फोट घेण्यास भाग पाडले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे गारखेडा भागात राहण्यास आलेल्या पीडितेच्या घरी येऊन सतत अत्याचार करू लागला. २ जुलै रोजी कारमधून (एमएच-२३-एयु ५००१) घरासमोर येऊन गोंधळ घातला. तुझे व्हिडिओ तुझ्या मुलांना दाखवतो अशी धमकी दिली. हा फक्त ट्रेलर आहे, जास्त शहाणपणा केलास तर इज्जत उतरविल अशी धमकी दिली.



# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सन्मान सोहळा

## ॲड. गौतम दादा भालेराव मित्र मंडळाचा उपक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध संघटनेतील, वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या, मान्यवरांचा सत्कार ॲड. गौतम दादा भालेराव मित्र मंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त, नागवंशी बुद्ध विहार या ठिकाणी करण्यात आला आहे.

दि.१० ऑगस्ट रोजी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीचे आयोजन, वडवणी या ठिकाणी करण्यात आले होते. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध पक्ष, विविध संघटना, व विविध क्षेत्रातील विशेष कामगिरी केलेल्या, त्याचबरोबर काही नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या. यानिमित्त लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीचे निमित्त साधून मान्यवरांचा सन्मान सोहळा करण्यात आला होता. हे काम गौतम दादा भालेराव मित्र मंडळ बीड जिल्हा यांच्यावतीने करण्यात आलं होत.

वडवणी शहरातील नागवंशी बुद्ध विहार, या ठिकाणी दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजता या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते दयानंद स्वामी हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सिद्धार्थभाऊ शिनगारे हे होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस दादासाहेब मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दीपक भाऊ थोरात, शैलेंद्र पोटभरे, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, वडवणी नगरपंचायतचे सभापती बाबासाहेब वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते युवराज शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब राऊत, समाजसेवक तेजस शिंदे, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष अमोल डोंगरे, मानवी हक्क अभियानचे महादेव उमप, बीएसपी चे माजलगाव विधानसभा अध्यक्ष जालिंदर साळवे, ॲड. राजेश शिंदे इत्यादी उपस्थित होते.

# बीड एस.टी. विभागात मोठा भ्रष्टाचार उघड!

## ३५,००० ते ५०,००० मध्ये नेमणुकींचा सौदा, सेवाज्येष्ठतेचे नियम धाब्यावर!





**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागात सेवाज्येष्ठतेचे नियम, शासन परिपत्रके आणि बदली अधिनियम २००५ चे उघड उल्लंघन करत भ्रष्टाचाराचा मोठा खेळ उघड झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशांनुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना केवळ तात्पुरती बढती देण्यात यावी, असे आदेश असताना देखील बीड विभाग नियंत्रक अनुजा दुसाने आणि पवार यांनी संगनमत करून मनमानी नेमणुका केल्याचा आरोप जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी (पश्चिम) अजय सरवदे यांनी केला आहे.

संपूर्ण प्रकार १७ सप्टेंबर २०२० रोजी महामंडळाने जारी केलेल्या पत्र क्र. राप/कर्मवर्ग/म.व./२४९८ मध्ये ८ सप्टेंबर २०१७ च्या परिपत्रकानुसार कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता मूळ नेमणुकीच्या तारखेपासून ग्राह्य धरण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, या आदेशांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून, तात्पुरती बढती घेतलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक सेवाज्येष्ठतेनुसार न करता पैशांच्या देवाणघेवाणीतून करण्यात आली. चौकशीत उघड झाले की, विभागीय कार्यालयात ३५,००० ते ५०,००० दराने नेमणुकींचे सौदे झाले. हा प्रकार पवार नावाच्या जातीयवादी कर्मचाऱ्याच्या पुढाकाराने झाला असून, विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांनी त्यात सक्रिय सहभाग घेत आर्थिक हिस्सा उचलल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

विभागीय कार्यालय बीड येथे सेवा जेष्ठतेचे नियम मोडून पदभार वितरण, डेपो आणि विभागीय कार्यालयात बिंदूनामावलीप्रमाणे अधिकारी-कर्मचारी नियुक्त न करणे, बदली अधिनियम २००५ चे उघड उल्लंघन, शासन परिपत्रक व सेवाज्येष्ठतेची नियमावली पूर्णपणे दुर्लक्षित अजय सरवदे यांची ठाम मागणी या भ्रष्टाचार प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी, दोषींवर विभागीय आणि कायदेशीर कारवाई, सर्व अनियमित नेमणुका व बदली आदेश रद्द करून सेवाज्येष्ठतेनुसार नव्याने नेमणुकी. हे प्रकरण केवळ नियमभंग नाही, तर पैशांच्या लोभापायी सरकारी व्यवस्थेवर केलेला उघड दरोडा आहे. आम्ही हे प्रकरण शांत बसून पाहणार नाही, असा इशारा सरवदे यांनी दिला आहे.

# श्री प्रभू वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता होणार ३५१ कोटीचा : माजी मंत्री आ.धनंजय मुंडे



**परळी । प्रतिनिधी**

परळी येथील श्री प्रभू वैद्यनाथ पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभुजा मंदिर व परिसराच्या विकास कामाचा आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षखालील जिल्हाधिकारी कार्यालय येथे आढावा घेण्यात आला. यावेळी एकाच आराखड्याच्या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या व नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामाचे सादरीकरण करण्यात आले.

मंदिर व परिसराचा विकास करताना पौराणिक महत्व अभाधित राखून अभूतपूर्व विकास कार्य करण्यात यावे. असे सूचना आदरणीय दादांनी सर्व संबंधितांना दिल्या. वाहनतळ, मोरगिरी, पर्वत, परिसरातील कामे, दर्शन यांसह लागणाऱ्या अधिकच्या जमीन अधिग्रहण करण्याची जबाबदारी मी घेतली आहे. वाढीव जागेसह विविध कामाच्या प्रतीतेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत विनंती करताच दादांनी ती मान्य केली असून. आता आराखडा २६८.६८ कोटी वरून ३५१ कोटीवर मोबाईल मध्ये इतका वाढवण्यास दादांनी मान्यता दिली असून. या कामाला गती व निधी मंजूर करता यावा यासाठी हे काम नियोजन विभागाकडे वर्ग करण्यासही दादांनी मान्यता दिली आहे.

आदरणीय दादाचे व सर्व संबंधितांचे परळीकराच्या व सर्व शिवभक्तांच्या वतीने हृदयी आभार. म्हणूनच म्हणालो भक्त असलेले साहेब अभ्यासयुक्त मांडणी करतात तेव्हा २६८ कोटीचा विकास आराखडा ३५१ कोटीचा होतो !! आदरणीय अजितदादा पवार साहेब यांचे मंजुरी दिल्याबद्दल आणि आदरणीय धनंजय मुंडे साहेब यांचे आग्रहपूर्वक मंजूर करून घेतल्याबद्दल एक शिवभक्त म्हणून दिसलसे आभार मानले.



# दखल न घेतल्याचा निषेध म्हणून १५ ऑगस्टला १५ मिनिटे भोपळा, बेशरम घेऊन साचलेल्या चिखल पाण्यात लोटांगण

## जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, अभियंता आर.व्हि. भोपळे यांना दिले निवेदन

**कडा । प्रतिनिधी**

जसे आपण शेरी या गावातील पुलाची पहाणी करुन प्रश्न मार्गी लावला तसाच कडा येथील प्रश्न मार्गी लावावा.मी संबंधित अधिकाऱ्यांना व्हाट्सअप वर फोटो, व्हिडिओ पाठवून संपर्क करून विनंती केली तरी दखल घेतली नाही. वृत्तपत्रातून त्याबाबत बातम्या प्रकाशित झाल्या तरीसुद्धा दखल घेतली नाही याचा निषेध म्हणून १५ आँगस्ट २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११:३० वाजता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ कडा (ता.आष्टी) गावातील दावलमलिक (शादवल) दर्गा समोर साचलेल्या चिखल-पाण्याच्या ढवात भोपळा, बेशरम घेऊन १५ मिनिटे लोटांगण घेऊन निषेध व्यक्त करणार बाबतचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रहेमान सय्यदअली सय्यद यांनी तहसीलदार आष्टी व त्यांच्या मार्फत जिल्हाधिकारी बीड, उपविभागीय अधिकारी पाटोदा, अभियंता आर. व्हि भोपळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ यांना दिले.

निवेदनात पुढे असे नमूद केले आहे की, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ या मार्गावरील साबलखेड कडा आष्टी रस्त्याचे काम चालू असून आष्टी तालुक्यातील कडा या गावातील दावलमलिक (शादवल) दर्गा समोर रस्त्याचे काम करतांना दोन्ही बाजूंनी गटारी बनवल्या पावसाचे पाणी जाण्यासाठी त्या गटारीला जागोजागी चार इंचाचे छिद्रे ठेवली होती परंतु रस्ता बनवताना चक्क ते सगळेच्या सगळेच छिद्रे रस्त्यात बुजून टाकली. त्यामुळे पावसाचे पाणी जाण्यासाठी मार्गच राहिला नाही. परिणामी दर्गा समोर कायमच पाण्याचा ढव चिखल साचून राहत आहे. ये-जा करतांना कसरत करावी लागत आहे पाय घसरून पडण्याची भिती, वाहनांचे अपघात होण्याची दाट शक्यता असल्याने मी संबंधित अधिकारी अभियंता भोपळे साहेब सह इतर संबंधितांना व्हाट्सअप वर फोटो, व्हिडिओ पाठवले. भ्रमणध्वनीवर संपर्क साधला परंतु ते अधिकारी म्हणतात की मी यांना सांगितले, मी त्यांना सांगितले, होईल तुमचे काम असे कारण देत टाळाटाळ करीत आहेत. एक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता असूनही जर हे अधिकारी आमची दखल घेत नसतील तर सामान्य नागरिकांशी हे कसे वागत असतील ? कडा गावातील याच रस्त्यावर चिखल - पाण्याचे ढव मोठ्या पुलावर हि आहे आणि इतर ठिकाणी हि आहेत.

सध्या कडिनदी वाहत असल्याने बस स्थानक, महेश मंदिर, हजरत मौलाली बाबा दर्गासह इतर देवस्थानात जाताना या रस्त्यावरून कसरत करत व वाहनांमुळे चिखल-पाणी अंगावर येणार नाही याची काळजी करत चालावे लागत आहे. तरी आपणांस कळकळीची विनंती आहे कि आपण नागरीकांना या होणाऱ्या त्रासातून मुक्त करावे तसेच यामुळे भविष्यात होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी यावर लवकरात लवकर उपाययोजना करावी अशी विनंती केली आहे. तसेच यावेळी ही दखल घेतली गेली नाही तर लवकरच आंदोलन करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

# परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर प्रकरणी चौकशी समिती गठीत करा : सय्यद सलीम बापू



**बीड । प्रतिनिधी**

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंग प्रकरणी विशेष चौकशी समिती गठींकरून दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे अशी मागणी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे.

असे की, परळी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत येणारी ऐतिहासिक देवस्थान नासर जंग दर्गा असून सदरील दर्गेला खिदमत माश एकूण १७८ एकर इनामी जमीन आहे. गेल्या काही वर्षांपासून सदरील देवस्थान मिळकतीवर येथील स्थानिक भूमाफिया यांचा डोळा असून ते सतत देवस्थान इनामी जमीन लाटण्याचा प्रयत्न करीत आहे. ऐतिहासिक दर्गा नासर जंगच्या मिळकतीवर अतिक्रमण करून टोले जंग इमारती बांधली जात असून सदरील मिळकतीच्या बोगस फेरफार करून पी.टी.आर व पी.आर कार्ड सुद्धा देण्यात आले आहे. तरी या प्रकरणी आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने वेळोवेळी निवेदने देऊन प्रकरण उघडगीस आणण्याचे काम केले आहे. येथील भूमाफिया यांनी परळी नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व पुरातत्व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केले. याप्रकरणी मी स्वतः परळी नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना ऐतिहासिक पुरावे का नष्ट केली जात आहे ? असे प्रश्न विचारले असता त्यांनी उडवा - उडवीची उत्तरे दिली. व त्यानंतर मी वक्फ मंडळाचे मुख्य अधिकारी यांना कॉल करून सदरील प्रकरणाची माहिती दिली असता त्यांनी तात्काळ जिल्हा वक्फ अधिकारी यांना प्रकरणाची चौकशी करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणार असल्याची माहिती दिली. तरी सद्यस्थितीत जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सदरील प्रकरणात कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही. तरी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाअंतर्गत येणाऱ्या ऐतिहासिक दर्गा नासर जंगचे ऐतिहासिक व परतत्व पुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न हे अत्यंत गंभीर असून हे सर्व प्रकार परळी येथे भूमाफिया, तलाठी, मंडळ, अधिकारी, तालुका निबंध आणि परळी नगर परिषद येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने होत आहे. या प्रकरणी विशेष चौकशी समिती गठीत करून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे अन्यथा येत्या १८ ऑगस्ट शुक्रवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदादा मरण उपोषण करण्यात येईल असे आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. यावेळी ॲड.सय्यद अल्ताफ, सय्यद इलियास भाई व समीर सिद्धीकीसह आंबेडकरी विचार मोर्चाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अपघातातील जखमी जनावरांचे प्राण डॉ. तेजस दुनघव यांनी वाचविले!



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानका समोर शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका अज्ञात वाहनाने मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना धडक दिली. यात मोकाट जानावरांसह म्हशींची दोन्ही पिल्ले गंभीर जखमी झाल्याची माहिती डॉ. तेजस दुनघव यांना मिळताच दुनघव यांनी तत्काळ जखमी जनावरांवर उपचार केल्यामुळे जीवदान मिळाले. डॉ दुनघव यांनी कामामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

बीड शहरातील बस स्थानकासमोर नेहमीच मोकाट जनावरांचा वावर असतो. काही प्रसंगी हे जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्यामुळे अनेक वेळा अपघात झालेले आहेत. शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका चारचाकी वाहन मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना जोरात धडक देऊन ही चारचाकी दुभाजकावर गेली. या अपघातात दोन म्हशीचे पिल्ले गंभीर जखमी अवस्थे मध्ये पडले होते. या घटनेची माहिती मिळताच जनावराचे डॉक्टर तेजस दुनघव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या जनावरांवर उपचार करायला सुरुवात केली. अगदी वेळेत उपचार सुरू झाल्यामुळे गंभीर जखमी जनावरांना वाचवण्यात डॉक्टर दुनघव यांना यश आले. मोकाट गंभीर जखमी झालेल्या या जनावरांवर उपचार करून त्यांना जीवदान देणाऱ्या डॉ. दुनघव यांनी केलेल्या या कामामुळे जनावराचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# धर्मादाय उप आयुक्त प्रदीप चौधरी यांनी शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्टच्या वादग्रस्त प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या तक्रारी!

- उप आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या भ्रष्ट व आर्थिक व्यवहाराची चौकशी करून कडक कारवाई करा
- उपमुख्यमंत्री अजित पवार यांना केली निवेदनाद्वारे मागणी
- चौधरी धर्मादाय उपआयुक्त आहेत की आर्थिक व्यवहार करणारे आयुक्त जनतेतून व्यक्त केला जातोय संतप्त सवाल




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास कार्यालयाचे प्रमुख प्रदीप मगनलाल चौधरी यांनी मागील अनेक दिवसांमध्ये बेकायदेशीर व नियम बाह्य कामे करून लाखोंची माया जमा केल्याच्या अनेकांनी तक्रारी लातूर आणि मुंबई येथील वरिष्ठ कार्यालयाकडे आल्या आहेत. तरी अद्याप या प्रकरणाची कसली ही चौकशी झाली नसल्याने माजी आ. बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, प्रगत विद्या प्रसारक मंडळ कुसळंब ता. पाटोदा आजीव सभासद बाळासाहेब पवार, नामलगाव ता बीड ग्रामस्थ व देवस्थानचे विश्वस्त, मोहीमाता शिक्षण संस्था मादळमोही ता. गेवराईचे सचिव वरूनराज सानप, श्रीराम पंचायतन दादेगावचे ता. आष्टी विश्वस्त गंगाधर पोटे, योगेश्वरी देवीचे भक्त ॲड. अनुपमकुमार बिडकर, अलरशीद शिक्षण संस्था बीडचे पिरजादे अहेमद यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देऊन प्रदीप चौधरी यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची व त्यांनी दिलेल्या निकालाची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी केली. सदर निवेदन देताना आ. धनंजय मुंडे आणि आ. विजयसिंह पंडित हे उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्ट, सामाजिक संस्था इत्यादी संस्थांचा कारभार ते धर्मदाय उप आयुक्त या ठिकाणाहून चालतो. ह्या कार्यालयाचे प्रमुख प्रदीप चौधरी यांच्यावर बेकायदेशीर व अनियमितता आणि आर्थिक व्यवहारातून काम करत असल्याचे अनेक आरोप होत आहेत. मागील काही दिवसापासून या आरोपाच्या संख्येत वाढ झाली आहे. बीड धर्मादायचे उप आयुक्त श्री.प्र.म. चौधरी यांनी वादग्रस्त शिक्षण संस्था व देवस्थान ट्रस्टच्या प्रकरणात निकाल दिले. या निकालासाठी मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप अनेक संस्था आणि देवस्थानच्या ट्रस्टीच्या वतीने केला जात आहे.

दुसरीकडे या बाबत बीड जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास विभागाचे उप आयुक्त प्रदीप मगनलाल चौधरी यांनी शिक्षण संस्था, देवस्थान ट्रस्टच्या वादाच्या प्रकरणात देण्यात आलेले निकाल हे आर्थिक व्यवहारातून केल्याच्या अनेक तक्रारी लातूर आणि मुंबई येथील वरिष्ठ धर्मादाय कार्यालयाकडे तक्रारदारांनी दिल्या आहेत. परंतु प्रदीप चौधरी यांची अद्याप कसलीही चौकशी झाली नाही. त्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक संस्था आणि संस्थेच्या प्रमुखांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देऊन बीडचे उप आयुक्त प्रदीप मगनलाल चौधरी त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विविध शिक्षण संस्था व देवस्थान ट्रस्टच्या वादग्रस्त प्रकरणांमध्ये झालेल्या निकालाची कसून चौकशी करून प्रदीप चौधरी यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी केली.

**प्रदीप चौधरी यांच्या विरोधात व्यक्त होतोय तीव्र संताप!**

धर्मादाय कार्यालयाच्या माध्यमातून जनतेला आणि संस्थांना योग्य न्याय दिला जात असतो परंतु या धर्मादाय कार्यालयाचे उप आयुक्त प्रदीप चौधरी यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार केल्याचे आरोप होत असल्याने त्यांच्या विरोधात जनतेतून राग व्यक्त होत आहे. प्रदीप चौधरी हे धर्मादाय उपआयुक्त आहेत की आर्थिक व्यवहार करणारे आयुक्त जनतेतून व्यक्त केला जातोय संतप्त सवाल जनतेतून विचारला जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT